# ९. वाचनाचे वेड

**आशा पाटील** (जन्म-१९७६) : प्रसिद्ध लेखिका. 'आठवणींचा पाऊस', 'बिल्वदल' हे काव्यसंग्रह; 'अमृतफळ', 'आत्मनाद', 'बंटीची फजिती', 'शूर वीर', 'पाखरं', 'शेवंताबाई' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध.

सोनालीने अवांतर वाचन करावे यासाठी तिच्या आईने केलेली युक्ती कशी सफल झाली, याचे वर्णन लेखिकेने प्रस्तुत पाठात केले आहे.

आजकालच्या मुलांना वाचन म्हणजे कंटाळवाणी गोष्ट वाटते. टीव्ही, व्हिडिओ गेम्स, कॉम्प्युटर, मोबाईल या सर्वांशी त्यांची मैत्री पक्की झाली आहे. खरेतर सोनालीलाही पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त इतर पुस्तक वाचनाची बिलकूल आवड नव्हती. तिची आई अन् मोठ्या भावाला मात्र आवड नव्हे, तर वाचनाचे वेडच होते. तिच्या आईने बऱ्याच वेळा वाचनाकडे तिचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. आपल्या अभ्यासाशिवाय दररोज किमान दोन पाने अवांतर वाचावीत, असे तिचे मत होते. खूप प्रयत्न करूनही सोनालीला अवांतर वाचनासाठी प्रवृत्त करण्याकरिता आईला यश येत नव्हते.

एकदा सुट्टीमध्ये तिच्या आईने एक गोष्टींचे पुस्तक तिच्या हातात दिले अन् तिला सांगितले, ''सोनाली, मला एका शाळेत पाहुणी म्हणून बोलवलं आहे. तिथे मुलांना मी एक गोष्ट सांगणार आहे. मला खूप काही गोष्टी माहीत आहेत; पण कोणती गोष्ट सांगू ते समजेना. या पुस्तकातली एक गोष्ट सांगावी असं वाटतंय. तू यांतली एक छानशी गोष्ट मला निवडून दे. मी तीच गोष्ट शाळेत सांगेन.''

आईला मदत म्हटल्यावर सोनालीला शाळेत बाईंनी सांगितलेले आठवले. 'आपण सर्वांना मदत केली पाहिजे. या मदतीची सुरुवात घरापासून करा. मदत करण्याने आपल्याला तर आनंद होतोच; पण दुसऱ्याचा आनंद हा आपल्याला समाधान देऊन जातो. तुम्ही घरी किंवा इतर ठिकाणी कोणकोणती मदत करता, त्याची नोंद ठेवा आणि ती दर शनिवारी दाखवा.'

सोनालीने आतापर्यंत बऱ्याच नोंदी वहीत केल्या होत्या. आईला मदत, ही एक नवीन नोंद होईल, बाईदेखील सगळ्यांसमोर आपले कौतुक करतील,



शाबासकी देतील या विचाराने तिने पटकन 'हो' म्हणून आईच्या हातातले पुस्तक घेतले.

आईने तिला दिलेल्या पुस्तकात छोट्या छोट्या कथा होत्या. नुसत्या कथांची नावे वाचून कोणती कथा निवडावी हे तिला कळेना. शेवटी तिने नाइलाजाने एक-एक करून जवळ जवळ दहा कथा वाचल्या. अवघ्या एक-दीड तासात सारे पुस्तक वाचून झाले. खरेतर प्रथम तिला हे फारच कंटाळवाणे वाटले होते; पण जसजशी ती पुस्तकातल्या कथा वाचू लागली, तसतशी तिला पुढची कथा काय आहे, त्यात काय लिहिले आहे, याविषयी उत्सुकता वाटू लागली. त्यानंतर तिने पुस्तक केव्हा संपवले, हे तिलाच कळले नाही.

कथा तर सगळ्याच आवडल्या, त्यांतली कोणती निवडावी ते समजेना. ती आईकडे गेली व आपल्या

समोरील समस्या सांगितली. मग आईने तिला प्रत्येक कथेचा थोडक्यात सारांश एका पानावर लिहिण्यास सांगितले. सोनालीला प्रथम हे काम सोपे वाटले; पण एक-दोन कथांनंतर पुढच्या कथेत काय आहे हे पटकन आठवेचना. तिने आईला 'मी पुन्हा एकदा पुस्तक वाचते' म्हणून सांगितले. खरेतर आज घरात आजी, आजोबा, बाबा, दादा, काकू, काका या साऱ्यांनाच सोनालीकडे पाहून नवल वाटत होते.

आता तिने एक पान घेतले, त्या पानावर कथेचे नाव अन् त्या कथेत काय सांगितले आहे ते थोडक्यात लिहिले. बघता बघता तिचे पान भरले होते. ती पळतच आईकडे गेली अन् तिने आईला ते पान दाखवले. आईला ते सारे पाहून तिचे खूप कौतुक वाटले. आईने तिचे घरातल्या साऱ्यांपुढे कौतुक केल्यामुळे तिचा आनंद गगनात मावत नव्हता.

शाळेत गेल्यानंतर तिने आपण काल आईला काय आणि कशी मदत केली ते सांगितले आणि सोबत एक कथाही ऐकवली. तिने आजपर्यंत कधीच अवांतर वाचन केले नव्हते. तिच्यातला हा आमूलाग्र बदल सर्वांना आनंद देणारा होता. वर्गात प्रथम बाईंनी, आईला मदत केली म्हणून अभिनंदन केले आणि नंतर तिने वर्गात एवढी छान गोष्ट सांगितली म्हणून कौतुकाने तिच्या पाठीवर शाबासकी दिली.

सोनालीला आज खूप खूप आनंद झाला होता. तिने आता घरातल्या, शाळेच्या वाचनालयातल्या अनेक पुस्तकांचे वाचन करायचे ठरवले होते. आईने सांगितल्याप्रमाणे तिने एक वही केली होती. त्यामध्ये ती आवडलेल्या ओळी किंवा एखादा प्रसंग लिहून ठेवत असे. सोनालीला प्रोत्साहन देण्यासाठी बाबांनी तिच्या वाढदिवसाला एक छानसे पुस्तक तिला भेट दिले आणि सोबत तिच्या वर्गातील साऱ्याच मुलामुलींना एकेक पुस्तक भेट स्वरूपात दिले. सोनालीला आता 'पुस्तक वाचत जा,' असे सांगण्याची गरजच उरली नव्हती.



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून योग्य गतीने समजपूर्वक पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे. या पाठाचे विद्यार्थ्यांकडून संवादरूपात सादरीकरण करून घ्यावे. पाठातील एखाद्या परिच्छेदाचे अनुलेखन तसेच श्रुतलेखन करून घ्यावे.

**शब्दार्थ :** **मन वळवणे** – तयार करणे. **नवल वाटणे** – आश्चर्य वाटणे. **आनंद गगनात न मावणे** – खूप आनंद होणे. **आमूलाग्र** – मोठ्या प्रमाणात.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सोनालीने काय करावे असे आईला वाटत होते?

(आ) सोनालीच्या घरातील सर्वांना तिच्याकडे पाहून नवल का वाटत होते?

(इ) सोनालीला प्रोत्साहन देण्यासाठी तिच्या बाबांनी काय केले?

**प्र. २. खालील घटनांमागील कारणे लिहा.**

(अ) आईने सोनालीच्या हातात एक गोष्टीचे पुस्तक दिले.

(आ) आईने सोनालीला कथेचा सारांश लिहायला सांगितला.

(इ) सोनालीला आता 'पुस्तक वाचत जा', असे सांगण्याची गरज उरली नव्हती.

**प्र. ३. खालील आकृती पूर्ण करा.**

**मुलांचे अवांतर वाचनाव्यतिरिक्त मैत्री असणारे घटक**

**प्र. ४. अभ्यासाबरोबरच तुम्हांला इतर कोणत्या गोष्टी करायला आवडतात? का ते लिहा.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्प्रचारांच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा व लिहा.**

(अ) सफल होणे–

(१) यशासाठी झटणे. (२) यशस्वी होणे. (३) अपयश येणे.

(आ) नोंदी करणे–

(१) लिहून ठेवणे. (२) नोंदवही लिहिणे. (३) लक्षात ठेवणे.

(इ) आनंद गगनात न मावणे–

(१) आनंद वाहून जाणे. (२) दु:खी होणे. (३) खूप आनंद होणे.

(ई) नवल वाटणे–

(१) आश्चर्य वाटणे. (२) खूप आनंद होणे. (३) नाराज होणे.

**(आ) खालील शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.**

(अ) आमूलाग्र (आ) शाबासकी (इ) अवांतर

**(इ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द चौकटीतून शोधून लिहा.**

(अ) बक्षीस (आ) यश (इ) गोष्ट (ई) मदत (उ) आवड.

| |
|---|
| कथा विजय<br>साहाय्य<br>रस पारितोषिक |

______________
______________
______________
______________
______________

**(ई) हात व हस्त हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. खालील शब्द वाचा व त्यांचे अर्थ शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

हस्तकला, हस्ताक्षर, हस्तांदोलन, हातकंकण, हातखंडा, हातमोजे, हस्तक्षेप.

**उपक्रम :**

तुम्हांला आवडणाऱ्या विषयांची पुस्तके वाचा. वाचलेल्या प्रत्येक पुस्तकाचा थोडक्यात सारांश आपल्या वहीत लिहा.

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**

(अ) अजय आणि विजय शाळेत पोहोचले अन् पावसाची रिपरिप सुरू झाली.
(आ) मला पाऊस खूप आवडतो, कारण मला पावसात भिजायला आवडते.
(इ) रमेश व रत्ना मावशीकडे पुण्याला गेले.
(ई) आम्ही खूप प्रयत्न केले म्हणून आम्ही जिंकलो.
(उ) बाबा रिक्षा किंवा बसने प्रवास करतात.

वरील वाक्यांतील अधोरेखित शब्द **उभयान्वयी अव्यये** आहेत. शिवाय, की, परंतु, म्हणजे, तरी, नि, अन् हे सर्व शब्द दोन शब्दांना किंवा दोन वाक्यांना जोडण्याचे काम करतात, म्हणून हे शब्द **उभयान्वयी अव्यये** आहेत.

**लक्षात ठेवा :** उभय म्हणजे दोन व अन्वय या शब्दाचा अर्थ संबंध असा आहे. वाक्यातील दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांचा संबंध जोडणे, हे उभयान्वयी अव्ययाचे कार्य आहे.

- **खालील संवादातील उभयान्वयी अव्यये अधोरेखित करा.**

**आई :** आपल्याकडे पाहुणे येणार आहेत, म्हणून आपण पुरणपोळी करूया.

**अंकुश :** आई, तू बटाट्याची भाजी अन् पुऱ्या कर म्हणजे मी तुला मदत करू शकेन, शिवाय स्वयंपाकही लवकर होईल. जर पाहुणे लवकर आले, तर त्यांना वेळेवर जेवायला मिळेल; पण पाहुण्यांना आवडेल ना आपण केलेला स्वयंपाक?

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना उभयान्वयी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा.

## ● आम्ही बातमी वाचतो.



## वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा...



**आदर्शनगर, ता. १६ :** दि.१५ ऑक्टोबर रोजी साधना विद्यालय, आदर्शनगर येथे वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यालयात अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथदिंडीने करण्यात आली. आदर्शनगर परिसरातील महत्त्वाच्या चौकांत 'वाचनसंस्कृती वाचवा' या विषयावर मुलांनी पथनाट्ये सादर केली. त्याचबरोबर विद्यालयात 'उत्कृष्ट वाचन' ही स्पर्धा घेण्यात आली. यात मुलांनी त्यांच्या आवडत्या कथा, कवितांचे वाचन केले. या स्पर्धेत इयत्ता सातवीतील शेखर काजळे या विद्यार्थ्यास 'उत्कृष्ट वाचक' म्हणून बक्षीस देण्यात आले. पुढील काळामध्ये वाचनसंस्कृती विकसित व्हावी, या दृष्टीने विद्यालयात विविध उपक्रम राबवले जाणार असल्याचे मुख्याध्यापकांनी या प्रसंगी घोषित केले. विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने वाचन प्रेरणा दिन साजरा केला.

- **वरील बातमीच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) कोणाचा जन्मदिवस आपण वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करतो?
(२) वरील बातमी कोणत्या तारखेची आहे?
(३) वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने कोणकोणत्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले?
(४) कोणत्या विद्यार्थ्यास 'उत्कृष्ट वाचक' म्हणून बक्षीस देण्यात आले?
(५) विद्यार्थ्यांमध्ये वाचनकौशल्य वाढावे, यासाठी शाळेत कोणकोणते उपक्रम आयोजित करता येतील, यावर गटात चर्चा करा. त्याची यादी तयार करा.

D2KMM7

### आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**

(अ) असे स्थळ — जे निसर्गरम्य आहे.
(आ) आभाळ भरून आले, पण —

वरील वाक्यांमध्ये '—' हे चिन्ह आले आहे. वाक्यांमध्ये '—' हे चिन्ह दोन कारणांनी वापरतात.

(१) स्पष्टीकरण द्यायचे असल्यास.
(२) बोलताबोलता विचारमालिका तुटल्यास.

'—' या चिन्हास **अपसरणचिन्ह** म्हणतात.

**लक्षात ठेवा :** अपसरणचिन्हाची लांबी संयोगचिन्हापेक्षा जास्त असते.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या बातम्यांचे श्रवण/वाचन करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना एखादा विषय देऊन संबंधित बातम्यांचे संकलन करण्यास सांगावे. उदा., क्रीडा.